# दि सेतु को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड

(नोंदणी क्र. : ११६३/८४-८५)

## ४२ वा वार्षिक

# अहवाल

## २०२५-२०२६

ऑडिट वर्ग ''अ''





बचत ठेवी | सोनेतारण कर्ज | वाहन कर्ज | गृह (गृहनिर्माण) कर्ज | शैक्षणिक कर्ज | लॉकर सुविधा

बोरिवली | वसई | विरार | सफाळे | पालघर | माहीम | बोईसर | चिंचणी | डहाणू | बोर्डी

कार्यालय : १ व २, वैशाली अपार्टमेंटस्, टी. पी. एस्. III, लोकनेते अण्णासाहेब वर्तक मार्ग, बोरिवली (प), मुंबई -४०० ०९२.
दूरध्वनी : ०२२-४७५११८८९ (मो.) : ८१६९३७७९०८ I email : setucoopcreditborivali@gmail.com
web : www.setuco-opcredit.com

# दि सेतु को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड

## संचालक मंडळ - सन २०२३ - २०२८



श्री. प्रकाश काशिनाथ वर्तक
अध्यक्ष



श्री. चिंतामण भालचंद्र ठाकूर
उपाध्यक्ष



श्री. नरेंद्र दाजी वर्तक
संचालक



श्री. भालचंद्र पांडुरंग जाधव
संचालक



श्री. भूषण काशिनाथ वर्तक
संचालक



श्री. धनेश भास्कर वर्तक
संचालक



श्री. संजीव विनायक राऊत
संचालक



श्री. भरत पुरूषोत्तम चौधरी
संचालक



श्री. विलास पांडुरंग सावे
तज्ज्ञ संचालक



सौ. जिज्ञासा कुंदन म्हात्रे
संचालिका



सौ. उज्वला रामकृष्ण पाटील
संचालिका



सौ. सुमती दत्तात्रय अरण्य
संचालिका



श्री. सोनु आत्माराम आरेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. मनिष कमळाकर पाटील
वरिष्ठ प्रबंधक

# संचालक मंडळ - सन २०२३ - २०२८

| क्र. | संचालकाचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश काशिनाथ वर्तक | अध्यक्ष |
| २ | श्री. चिंतामण भालचंद्र ठाकूर | उपाध्यक्ष |
| ३ | श्री. नरेंद्र दाजी वर्तक | संचालक |
| ४ | श्री. भालचंद्र पांडुरंग जाधव | संचालक |
| ५ | श्री. भूषण काशिनाथ वर्तक | संचालक |
| ६ | श्री. धनेश भास्कर वर्तक | संचालक |
| ७ | श्री. संजीव विनायक राऊत | संचालक |
| ८ | श्री. भरत पुरूषोत्तम चौधरी | संचालक |
| ९ | श्री. विलास पांडुरंग सावे | तज्ज्ञ संचालक |
| १० | सौ. जिज्ञासा कुंदन म्हात्रे | संचालिका |
| ११ | सौ. उज्वला रामकृष्ण पाटील | संचालिका |
| १२ | सौ. सुमती दत्तात्रय अरण्य | संचालिका |
| १३ | श्री. सोनु आत्माराम आरेकर | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**-: विधी सल्लागार :-**

ॲड. सौ. कविता स. पाटील, पालघर
ॲड. श्री. एस्.के.कलाल, मुंबई
ॲड. श्री. हितेश दि. पटेल, मुंबई
ॲड. सौ. कलावती सु. कुडू, डहाणू

ॲड. कु. सावनी पाटील
ॲड. कॅथरीन कोलॅसो, वसई
ॲड. सौ. अमिता के. पाटील (जैन)
ॲड. श्री. अजिंक्य ठाकूर, दहिसर
ॲड. श्री. अलबर्ट पी. डाबरे, वसई
ॲड. श्री. अंकीत नईथाणी
ॲड. श्री. देवेंद्र दि. राऊत, वसई

ॲड. श्री. प्रदिप स.म्हात्रे, विरार
ॲड. श्री. जयंत अनंत राऊत, पालघर
ॲड. सौ. देवश्री राऊत, वसई
ॲड. सौ. दिप्ती ह. राऊत, डहाणू

**-: वैधानिक लेखापरीक्षक :-**

मे. अपराज अँड असोसिएटस् सनदी लेखापाल
M.No.182626

**-: समवर्ती लेखापरीक्षक :-**

मे. वृषल चौधरी ॲण्ड कंपनी

**✲ बँकर्स ✲**

✲ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
✲ दि सारस्वत को.ऑप. बँक लि.
✲ बसिन कॅथॉलिक को.ऑप.बँक लि.
✲ वसई विकास सहकारी बँक लि.
✲ म्युनिसिपल को.ऑप. बँक लि.
✲ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
✲ टी.जे.एस्.बी. सहकारी बँक लि.
✲ डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
✲ एन.के.जी.एस्.बी.बँक लि.
✲ युनिटी स्मॉल फायनान्स बँक
✲ वसई जनता सरकारी बँक
✲ कॉसमॉस सहकारी बँक लि.
✲ बँक ऑफ बडोदा
✲ ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.
✲ मॅको बँक, मुंबई.
✲ स्टेट बँक ऑफ इंडिया

## अनुक्रमणिका


१. वार्षिक सभेची सूचना . . . . . ३
२. वार्षिक अहवाल . . . . . ४
३. सेतु एका दृष्टीक्षेपात . . . . . ०९
४. वैधानिक लेखापरीक्षण अहवाल . . . . . ११
५. सेतुची दृष्टीक्षेपातील वाटचाल . . . . . १३
६. ताळेबंद पत्रक . . . . . १४
७. वार्षिक नफा-तोटा पत्रक . . . . . १८
८. परिशिष्ट - अ - येणी, देणी, इतर खर्च व उत्पन्न . . . . . २०
९. अंदाज पत्रक . . . . . २२
१०. सन २०२५-२०२६ चा शाखानिहाय तपशील . . . . . २३
११. सेतुचा अधिकारी व कर्मचारी वर्ग . . . . . २४
१२. सभासदांना विशेष विनंती . . . . . २५
१३. सभासदांना नम्र विनंती . . . . . २८
१४. ऋणनिर्देश . . . . . २९
१५. ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर. . . . . ३०
१६. शाखा कार्यालयांचे पत्ते . . . . . ३२

# * सल्लागार समिती - सन २०२३ -२०२८ *

**श्री. प्रकाश का. वर्तक**
अध्यक्ष (पदसिध्द)

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. पुरुषोत्तम वि.वर्तक** | निमंत्रक | **श्री. दिगंबर वा.राऊत** | सदस्य |
| **श्री. गोपीनाथ ज. वर्तक** | सदस्य | **श्री. जयवंत भा. म्हात्रे** | सदस्य |
| **श्री. कमळाकर गो.चौधरी** | सदस्य | **श्री. प्रमोद ज. पाटील** | सदस्य |

## व्यवसाय वृद्धी समिती शाखानिहाय - सन २०२३ - २०२८

### * बोरिवली *

| | |
|---|---|
| श्री. पांडुरंग दा. वर्तक | अध्यक्ष |
| श्री. प्रदिप ह. सावे | निमंत्रक |
| श्री. मिलिंद प्र. पाटील | सदस्य |
| श्री. नरोत्तम क. चुरी | सदस्य |
| श्री. राजेंद्र दा. चौधरी | सदस्य |
| श्री. सुनिल अ. वर्तक | सदस्य |
| श्री. नंदकुमार ना. वर्तक | सदस्य |
| श्री. तुषार मो. पाटील | सदस्य |
| श्री. ज्ञानेश्वर मो. म्हात्रे | सदस्य |

### * सफाळे *

| | |
|---|---|
| श्री. संजीव काशिनाथ म्हात्रे | अध्यक्ष |
| श्री. नितीन रघुनाथ वर्तक | निमंत्रक |
| श्री. वसंत जनार्दन ठाकूर | सदस्य |
| श्री. पंकज अरुण म्हात्रे | सदस्य |
| श्री. प्रदिप कृष्णाजी म्हात्रे | सदस्य |
| श्री. अशोक भालचंद्र वर्तक | सदस्य |
| श्री. नितीन जगन्नाथ वर्तक | सदस्य |
| श्री. प्रदिप मोरेश्वर वर्तक | सदस्य |

### * माहीम *

| | |
|---|---|
| श्री. विजय लक्ष्मण सावे | अध्यक्ष |
| श्री. विजय जगन्नाथ पाटील | निमंत्रक |
| श्री. जयंत गणपत वर्तक | सदस्य |
| श्री. सुनिल भास्कर राऊत | सदस्य |
| श्री. अनिल नानाजी राऊत | सदस्य |
| श्री. जगदिश वासुदेव चुरी | सदस्य |
| श्री. नागेश मधुकर चुरी | सदस्य |
| श्री. कुंदन जगन्नाथ पाटील | सदस्य |
| श्रीम. शैला बाळकृष्ण राऊत | सदस्य |

### * चिंचणी *

| | |
|---|---|
| डॉ. श्री. विलास माधव सावे | अध्यक्ष |
| श्री. हरेश आत्माराम चुरी | निमंत्रक |
| श्री. काशिनाथ भाई पाटील | सदस्य |
| श्री. दत्तात्रेय बाबुराव पाटील | सदस्य |
| श्री. जयप्रकाश नारायण पाटील | सदस्य |
| कु. अरुणा काशिनाथ चुरी | सदस्य |
| श्री. कमलेश सुरेंद्र वर्तक | सदस्य |
| श्री. सतिश परशुराम सावे | सदस्य |

### * बोर्डी *

| | |
|---|---|
| श्री. भुपेंद्र हरिश्चंद्र सावे | अध्यक्ष |
| श्री. अविनाश भिकाजी सावे | निमंत्रक |
| श्री. दिलीप रामचंद्र सावे | सदस्य |
| श्री. शाम भालचंद्र पाटील | सदस्य |
| श्री. नितीन दिनानाथ सावे | सदस्य |
| श्री. राजन जगन्नाथ चुरी | सदस्य |
| श्री. प्रदीप नारायण चुरी | सदस्य |
| सौ. मिलन संजय पाटील | सदस्य |

### * पालघर *

| | |
|---|---|
| श्री. संदेश रमाकांत वर्तक | अध्यक्ष |
| श्री. संतोष अशोक चुरी | निमंत्रक |
| श्री. संजय रघुनाथ घरत | सदस्य |
| श्री. आशिष अनिल पाटील | सदस्य |
| श्री. प्रशांत अनंत पाटील | सदस्य |
| श्री. कल्पेश दत्तात्रेय म्हात्रे | सदस्य |

**टिप : बोरिवली व्यवसाय वृद्धी समितीची अहवाल साली एकही सभा झाली नाही.**

# दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड

(नोंदणी क्रमांक ११६३/८४-८५)

१ व २, वैशाली अपार्टमेंटस्, टी.पी.एस.III, लोकनेते अण्णासाहेब वर्तक मार्ग, बोरिवली (प), मुंबई - ४०००९२.

## ※ ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ※

दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड (सेतु) ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.०० वा. पॅराडाईज बँक्वेट्स अँड लॉन, सी.टी.एस. क्र. ४०७/डी, देवीदास क्रॉस लेन, अदानी इलेक्ट्रिसिटी कार्यालयासमोर, बोरिवली (प), मुंबई ४०० ०९२. येथे आयोजित केली आहे. तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### ※ सभेपुढील विषय ※

१) दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) सन २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल संमत करणे.
३) अ) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा तोटा पत्रक व ताळेबंदास मान्यता देणे.
   ब) सन २०२५-२०२६ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२५-२०२६ चा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल स्वीकारणे. मागील लगतच्या वर्षाच्या लेखा परीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकांचे निर्देश सादर करणे व अहवाल स्वीकारणे.
५) सन २०२६ -२०२७ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
६) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
७) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबद्दल माहिती देणे.
८) वसुलीचे अधिकार अबाधित ठेऊन थकित कर्ज रकमांचे निर्लेखन करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत.
९) सभासदांकडून सभेपूर्वी किमान चार दिवस अगोदर लेखी स्वरूपात आलेल्या सूचनांवर चर्चा करणे.
१०) ४२ व्या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासद आणि संचालकांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११) मान. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९२.
दिनांक : २१/०७/२०२६

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही
**(सोनु आ. आरेकर)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

### ※ विशेष सूचना ※

१) पर्याप्त गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ती परत अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) सादर केलेला अहवाल, नफातोटा पत्रक व ताळेबंद यासंबंधी खुलासा हवा असल्यास कृपया सभेपूर्वी किमान चार दिवस आधी (दिनांक २५-०८-२०२६ पर्यंत) लेखी सूचना द्यावी, म्हणजे त्याबाबतचा खुलासा सभेत करणे सोयीचे होईल.
३) वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत, माहिती व अवलोकनासाठी बोरिवली येथील मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.
४) सभेस येताना सभासदांनी कृपया वार्षिक अहवालाची प्रत सोबत आणावी.
५) ४२ व्या वार्षिक अहवालाची प्रत सेतुच्या www.setuco-opcredit.com या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

# ४२ वा वार्षिक अहवाल
## ❖ सन २०२५-२०२६ ❖

प्रिय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सस्नेह नमस्कार,

दि. सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या संचालक मंडळाच्यावतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ चा ४२ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच आगामी वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या समोर सादर करताना मला मनस्वी आनंद आणि अभिमान वाटत आहे.

गेली बेचाळीस वर्षे आपल्या सर्वांच्या विश्वास, सहकार्य आणि पाठबळाच्या बळावर सेतुने सहकार क्षेत्रात एक विश्वासार्ह, पारदर्शक आणि प्रगतिशील संस्था म्हणून आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीचा वेध घेत, सभासद-केंद्रित सेवा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत संस्थेने सातत्याने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी ठेव संकलन व कर्जवाटपाची अनुक्रमे रु. १६५ कोटी आणि रु. ११७ कोटी अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. संचालक मंडळाचे दूरदृष्टीपूर्ण नियोजन, अधिकारी व कर्मचारी वर्गाचे समर्पित कार्य आणि सर्व सभासदांच्या सक्रिय सहकार्यामुळे आर्थिक वर्ष अखेरीस रु.१५४.३१ कोटी ठेवी आणि रु. ११३.२१ कोटी कर्जवाटप या उल्लेखनीय टप्प्यांपर्यंत संस्था यशस्वीपणे पोहोचली आहे. ही कामगिरी आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील सर्वात अभिमानास्पद घटना म्हणजे वसई आणि डहाणू येथे सेतुने विस्ताराचे नवे पर्व सुरू केले. सभासदांच्या वाढत्या अपेक्षा आणि स्थानिक मागणीचा आदर राखत सुरू करण्यात आलेल्या या दोन शाखांमुळे संस्थेच्या सेवांचा विस्तार अधिक व्यापक झाला आहे. यामुळे अधिकाधिक नागरिकांना विश्वासार्ह आर्थिक सेवा त्यांच्या परिसरातच उपलब्ध झाल्या असून, सभासदांचा सेतुप्रती असलेला विश्वास आणि आपुलकी अधिक दृढ झाली आहे. हा विस्तार केवळ भौगोलिक वाढ नसून संस्थेच्या प्रगतीशील विचारसरणीचा आणि सभासद-केंद्रित कार्यपद्धतीचा ठोस पुरावा आहे.

सभासदांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले वार्षिक सभासद स्नेहसंमेलन हे देखील या वर्षातील विशेष आकर्षण ठरले. सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, मोठ्या संख्येने झालेली उपस्थिती आणि संवादातून व्यक्त झालेला विश्वास यामुळे संस्था आणि सभासद यांच्यातील नाते अधिक बळकट झाले.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात खाजगी बँका, डिजिटल बँकिंग, (Financial Technology) फिनटेक सेवा आणि सतत बदलणारे नियामक निकष यांसारखी अनेक आव्हाने आपल्या समोर आहेत. मात्र विश्वास, पारदर्शकता, तत्पर सेवा आणि सहकाराची मूल्ये या आपल्या भक्कम आधारस्तंभांमुळे सेतुने प्रत्येक आव्हानाचे संधीत रूपांतर केले आहे. यापुढेही आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर, सेवांचा दर्जा उंचावणे आणि सभासदांच्या अपेक्षांनुसार नवनवीन सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा भर राहील.

या यशस्वी प्रवासात संचालक मंडळातील सर्व सहकारी, विविध समित्यांचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी व कर्मचारी वर्ग, व्यवसायवृद्धी समित्या, दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या प्रत्येक

सभासदाचे योगदान अनमोल आहे. आपण संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी संचालक मंडळाच्यावतीने सर्वांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

भविष्यातही विश्वास, पारदर्शकता, सेवा आणि प्रगती या चतुःसूत्रीवर वाटचाल करत सेतुला सहकार क्षेत्रातील एक आदर्श, सक्षम आणि आधुनिक वित्तीय संस्था बनविण्याचा आमचा निर्धार कायम राहील. या प्रवासात आपण सर्वांनी पूर्वीप्रमाणेच सक्रिय सहभाग आणि सहकार्य द्याल, असा मला दृढ विश्वास आहे.

आपल्या सर्वांना व आपल्या परिवारास उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि उज्ज्वल भविष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

धन्यवाद!

संचालक मंडळाच्या वतीने,
**प्रकाश का. वर्तक**
अध्यक्ष

---

**१. संचालक मंडळ :-** कार्यात्मक वाढीसाठी तसेच सेतुच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी सेतुच्या संचालक मंडळाने यशस्वीपणे प्रयत्न केले आहेत. अहवाल सालात सेतुच्या संचालक मंडळाच्या एकूण १९ सभा झाल्या. त्यात माननीय संचालकांची सरासरी उपस्थिती ८७.७२% होती. सदर सभांमध्ये सर्व संचालकांचा सक्रिय सहभाग होता.

मासिक सभेतील नेहमीच्या विषयांव्यतिरिक्त महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय, व्यवसायवृद्धी, व्याजदरातील बदल, गुंतवणूक, थकीत कर्जवसुली इत्यादी विषयांवर सखोल व सविस्तर चर्चा करुन बहुमताने अंतिम निर्णय घेण्यात आले. तसेच न्यायप्रविष्ठ बाबींवर विधीसल्लागारांचे मत घेऊन त्याप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली. ठेवी संकलन, कर्ज वितरण, कर्ज वसुली या बाबींवर काटेकोरपणे लक्ष दिले गेले. सेतुच्या व्यवसाय विषयक कामामध्ये सुसूत्रता व गती येण्याच्या उद्देशाने संचालक मंडळाच्या अखत्यारीत विभागवार समित्यांची रचना करण्यात आली आहे. त्या सर्व समित्या आपापल्या विभागाची जबाबदारी प्रभावीपणे सांभाळीत असून त्याचा सेतुच्या व्यवसायवृद्धीवर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

**संचालक मंडळ सभा उपस्थिती तक्ता (२०२५ ते २०२६)**

| क्र. | संचालकाचे नाव | पद | एकुण सभा | उपस्थिती | क्र. | संचालकाचे नाव | पद | एकुण सभा | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश काशिनाथ वर्तक | अध्यक्ष | १९ | १९ | ७. | श्री. संजीव विनायक राऊत | संचालक | १९ | १९ |
| २. | श्री. चिंतामण भालचंद्र ठाकूर | उपाध्यक्ष | १९ | १६ | ८. | श्री. भालचंद्र पांडुरंग जाधव | संचालक | १९ | १८ |
| ३. | श्री. नरेंद्र दाजी वर्तक | संचालक | १९ | १६ | ९. | श्री. विलास पांडुरंग सावे | तज्ञ संचालक | १९ | १५ |
| ४. | श्री. भूषण काशिनाथ वर्तक | संचालक | १९ | १७ | १०. | सौ. जिज्ञासा कुंदन म्हात्रे | संचालिका | १९ | १८ |
| ५. | श्री. भरत पुरुषोत्तम चौधरी | संचालक | १९ | १७ | ११. | सौ. उज्वला रामकृष्ण पाटील | संचालिका | १९ | १६ |
| ६. | श्री. धनेश भास्कर वर्तक | संचालक | १९ | १८ | १२. | सौ. सुमती दत्तात्रेय अरण्य | संचालिका | १९ | ११ |

**२. सल्लागार समिती :-** अहवाल वर्षात सल्लागार समितीच्या एकूण दोन सभा झाल्या. आवश्यकतेनुसार त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून चर्चा करण्यात आली. कर्मचारी सेवा नियमावली, व्याजदरातील बदल, थकीत कर्जे इ. बाबत माननीय सल्लागार समितीकडून बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

**३. स्थानिक व्यवसाय वृद्धि समिती :-** संस्थेच्या दैनंदिन कामकाजात सुसूत्रता येण्याच्या दृष्टिने संचालक मंडळाने मुख्य कार्यालय स्तरावर नियुक्त केलेल्या उपसमित्या व्यतिरिक्त शाखा स्तरावर नियुक्त केलेल्या बोरिवली, सफाळे, माहीम, चिंचणी, बोर्डी व पालघर या सहा शाखांच्या स्थानिक व्यवसाय वृद्धि समित्यांनी सेतुच्या दैनंदिन कामात तसेच कार्यविस्तार, आर्थिक वाटचाल व कर्जवसुली या बाबतीत भरीव योगदान दिले. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद! स्थानिक समितीमध्ये सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे. अहवाल वर्षात सर्व शाखा (बोरिवली व्यवसाय वृद्धी समिती वगळता) स्थानिक व्यवसायवृद्धी समित्यांच्या सभांचे नियमितपणे आयोजन करण्यात आले हे कौतुकास्पद आहे.

## ☼ अहवाल वर्षकालीन कार्य ☼

**१. सभासद :-** अहवाल सालात सेतुचे एकूण ८९७ नवीन सभासद झाले. राजीनामा, स्थलांतर व मृत्यू इत्यादी कारणास्तव १२५ सभासदांचे सभासदत्त्व संपुष्टात आले. सेतुच्या सभासद संख्येमध्ये ७७२ ने वाढ होऊन ३१ मार्च २०२६ अखेरीस सेतुचे एकूण सभासद १४,०३९ इतके आहेत. सभासद संख्या वाढीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यासाठी सर्व सभासदांनी आपले कुटुंबीय, आप्तेष्ट, कार्यालयीन सहकारी, मित्र परिवार यांना सभासद करून सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**२. भागभांडवल :-** सेतुचे भागभांडवलाचे उद्दिष्ट रू.६.०० कोटी इतके ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात रू. ६.१९ कोटी इतके भागभांडवल जमा केले. गतवर्षीच्या रू ५.६७ कोटीच्या तुलनेत या आर्थिक वर्षात भागभांडवलामध्ये ९.१७% इतकी वाढ झालेली आहे.

**३. ठेवी :-** संस्था आणि सभासद यांच्यातील विश्वास कायम राखण्यासाठी कटिबद्ध असणे हे सर्व संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचे आद्य कर्तव्य आहे. संस्थेत आकर्षक विविध ठेव योजना आहेत. अहवाल साल अखेर सेतुचे ठेवींचे उद्दिष्ट रू १६५.०० कोटी इतके ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात रु. १५४.३१ कोटी इतक्या ठेवी संकलित झाल्या आहेत. गतवर्षीच्या रु. १४७.८८ कोटींच्या तुलनेत या आर्थिक वर्षात ठेवींमध्ये ४.३५% इतकी वाढ झाली आहे. ठेवींमध्ये सातत्याने होत असलेली वाढ हे ठेवीदारांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

**४. गुंतवणूक :-** दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरीस सेतुची गुंतवणूक रू. ६७.५१ कोटी इतकी आहे. गतवर्षी रु. ६७.६५ कोटी इतकी गुंतवणूक केली होती. गतवर्षीच्या तुलनेत गुंतवणुकीमधे -०.२१% इतकी घट झालेली आहे. सेतुकडे असलेला अतिरिक्त निधी तसेच वैधानिक बाबींची पूर्तता यांचा विचार करून गुंतवणूकीचा निर्णय घेण्यात आला. गुंतवणूक करण्यापूर्वी ज्या बँकांमध्ये गुंतवणूक करावयाची आहे, त्या बँकांचा मागील तीन वर्षांचा ताळेबंद, आर्थिक स्थिती, ऑडिट वर्ग, स्वनिधी, बँकींग क्षेत्रातील घडामोडी इत्यादींचा अभ्यास करून नियमानुसार गुंतवणूक केलेली आहे.

**५. कर्जे :-** सेतुने या वर्षी रू. ११७.०० कोटी इतके कर्जाचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी रू. ११३.२१ कोटी इतक्या रक्कमेच्या कर्जाचे उद्दिष्ट साध्य केले आहे. मागील वर्षीच्या रु. १०२.२० कोटीच्या तुलनेत कर्ज रक्कमेत १०.७७ % इतकी वाढ झालेली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कर्जवितरणासाठी प्रभावी मार्केटिंग करून कर्जाचे ठेवीशी प्रमाण (C.D. Ratio) ६३.६२% पर्यंत ठेवण्यास आपण यशस्वी झालो आहोत.

**अहवालकालीन वर्षात कोणत्याही संचालकाला सेतुने विना तारण कर्ज दिलेले नाही. तसेच संचालकांच्या नातेवाईकांनाही मर्यादेपेक्षा जास्त विना तारण कर्ज दिलेले नाही.**

**६. खेळते भांडवल :-** सेतुचे दि. ३१ मार्च २०२५ अखेर खेळते भांडवल रू.१८२.२५ कोटी इतके होते. ३१ मार्च २०२६ अखेर सेतुचे खेळते भांडवल रू १९२.०८ कोटी इतके झाले. खेळत्या भांडवलात गतवर्षीच्या तुलनेत ५.४०% इतकी वाढ झाली.

उपरोक्त आकडेवारीनुसार गतवर्षीच्या तुलनेत भागभांडवल, ठेवी, कर्ज, खेळते भांडवल या सर्व आर्थिक कार्यनिष्पत्तीत वाढ करण्यात आपणां सर्वांच्या सहकार्यामुळे यश आले हे नमूद करताना आनंद होत आहे.

**७. कर्जवसुली :-** प्रयत्न करूनही जी कर्जे अनुत्पादित होतात त्यांच्या वसुलीसाठी संचालक मंडळ सुनियोजित पद्धतीने सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. विशेष वसुली अधिकारी, कर्ज वसुली समितीचे समन्वयक आणि संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे वर्ष अखेरीस थकबाकी नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच ढोबळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण३.५२% वरुन २.६५% इतके आहे.

**८. वैधानिक लेखापरीक्षण :-** वैधानिक लेखापरीक्षक मेसर्स अपराज अँड असोसिएट, चार्टर्ड अकाउन्टंटस् (पॅनेल क्रमांक.M.No.182626) यांनी सन २०२५-२६ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. मेसर्स अपराज अँड कंपनी, चार्टर्ड अकाउन्टंटस् आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सूचनांबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

**सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ऑडिट वर्ग "अ" मिळालेला आहे.**

**९. अनुत्पादित कर्जे** (Non Performing Assets) सहकारी पतसंस्थांना लागू असलेल्या सुधारीत नियमाप्रमाणे सेतुची ६ महिन्यांपेक्षा जास्त काळ अनियमित कर्जे, ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPA) रू. ३,००,३३,५१५/- इतकी आहेत. शिल्लक (outstanding) कर्जाशी त्याचे प्रमाण २.६५% इतके आहे. सेतुची ३१ मार्च २०२६ अखेर बुडीत कर्जासाठी असलेली तरतूद रू.३,८३,०१,९४२/- व अनुत्पादित कर्जासाठी असलेली तरतूद रू. ८३,७६,४४०/- लक्षात घेता सेतुच्या निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०% इतके आहे. थकीत कर्जाच्या वसुलीसाठी आपण प्रयत्नशील आहोत. ही रक्कम कमीत कमी ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न संचालक मंडळातर्फे सुरु आहेत.

**यावर्षी चार शाखांचे अनुत्पादित कर्जाचे प्रमाण शुन्य टक्के आहे. हे नमुद करण्यास आम्हांला विशेष आनंद वाटतो.**

## अनुत्पादित कर्ज स्थितिदर्शक तक्ता

| | | |
|---|---|---|
| अनुत्पादित कर्जे शिल्लक दि. ०१-०४-२०२५ | रु. | ३,५९,४९,२४३/- |
| वजा-वसुली व सुधारीत श्रेणी | रु. | ५९,१५,७२८/- |
| अधिक-नवीन अनुत्पादित कर्जे | रु. | ० /- |
| अनुत्पादित कर्जे शिल्लक दि. ३१-३-२०२६ | रु. | ३,००,३३,५१५/- |

**१०. समवर्ती लेखापरीक्षण :-** लेखापरीक्षक मे. वृषल चौधरी अँड. कंपनी चार्टर्ड अकाउन्टंटस् यांनी १-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या कालावधीचे समवर्ती लेखापरीक्षण पूर्ण केले आहे.

रजिस्टर्ड मॉर्गेज, इक्विटेबल मॉर्गेज, KYC नॉर्म्स, दैनंदिन बचत ठेव, कर्ज मागणी अर्ज यांच्या पूर्ततेबाबत तसेच सेतुच्या दैनंदिन कार्यप्रणाली व कर्जवितरणोत्तर देखरेख व्यवस्था या बाबतीत समाधान व्यक्त करून त्यांनी उपयुक्त सूचना केल्या आहेत. मे.वृषल चौधरी अँड कंपनी, चार्टर्ड अकाउन्टंटस् यांचा तिमाही अहवाल प्राप्त झाल्यानंतर, लेखा-परीक्षकांनी केलेल्या सूचनांची पूर्तता करण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**११. सभासद कल्याण निधी :-** गंभीर आजाराच्या वेळी वैद्यकीय दाखल्यासह नियम व अटीनुसार सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत सेतु तर्फे सभासदांना लेखी मागणीवरून कमाल रू. १५,०००/- पर्यंत वैद्यकीय अर्थसहाय्य दिले जाते. या आर्थिक वर्षात वैद्यकीय अर्थसहाय्यासाठी तीन सभासदाकडून अर्ज प्राप्त झाला होता. संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर नियम व अटीनुसार एकूण रू.४५,००० /- इतक्या वैद्यकीय अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले.

तसेच सेतुतर्फे मृत सभासदांच्या वारसाच्या लेखी मागणीवरून कमाल रू. ५,०००/- चे अर्थसहाय्य दिले जाते. अहवालसाली एकूण सहा मृत सभासदांच्या वारसांना रू ३०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यात आले.

**१२. सामाजिक कृतज्ञता निधी :-** सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून कार्यरत असणाऱ्या शासन मान्यताप्राप्त सेवाभावी संस्थांना आपली संस्था सहाय्य करीत असते.

**१३. नवीन शाखांचा शुभारंभ - संस्थेच्या विकासातील महत्त्वपूर्ण टप्पा :-** दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या प्रगतीच्या वाटचालीत आर्थिक वर्ष २०२५-२६ हे वर्ष विशेष उल्लेखनीय ठरले. सभासदांच्या वाढत्या गरजा व दीर्घकालीन मागणी लक्षात घेऊन संस्थेने दोन नवीन शाखांचा शुभारंभ करून विस्ताराच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

संस्थेची नववी शाखा वसई येथे गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आली. सदर शाखेचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक व माजी अध्यक्ष मा. श्री. गोपीनाथ जगन्नाथ वर्तक यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ही शाखा दुकान क्रमांक ८, साईदीप रमेदी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, ओम हॉस्पिटलसमोर, पारनाका, वसई (पश्चिम) येथे कार्यान्वित करण्यात आली. उद्घाटन समारंभास सभासदांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून संस्थेप्रती असलेला विश्वास व आपुलकी व्यक्त केली.

त्यानंतर संस्थेची दहावी शाखा डहाणू येथे शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सुरू करण्यात आली. या शाखेचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक व प्रथम अध्यक्ष मा. श्री. दिगंबर वामन राऊत यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ही शाखा दुकान क्रमांक २९, महालक्ष्मी प्लाझा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, बँक ऑफ बडोदा समोर, डहाणू (पश्चिम) येथे सुरू करण्यात आली. या प्रसंगी सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नती संघाचे विद्यमान अध्यक्ष तसेच प्रसिद्ध उद्योजक मा. श्री. नरेशभाई जनार्दन राऊत यांची विशेष उपस्थिती लाभली.

वसई व डहाणू या दोन्ही ठिकाणी शाखा सुरू करण्याचा संस्थेचा मानस अनेक वर्षांपासून होता. या भागातील सभासदांकडून सातत्याने होत असलेली मागणी, वाढता प्रतिसाद आणि संस्थेच्या सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संचालक मंडळाने अथक प्रयत्न केले. विविध प्रशासकीय व कार्यात्मक अडचणींवर मात करून चालू आर्थिकवर्षात या दोन्ही शाखा सुरू करण्यात यश मिळाले.

दोन्ही शाखांना सुरुवातीपासूनच सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून संस्थेच्या व्यवसायवृद्धीसाठी तसेच सभासद सेवा विस्तारासाठी या शाखा महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. या दोन्ही उद्घाटन समारंभांना संस्थेचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

नवीन शाखांच्या माध्यमातून संस्थेची आर्थिक सेवा अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्याचा संकल्प अधिक दृढ झाला असून भविष्यातही सभासद-केंद्रित सेवा, विश्वासार्हता आणि प्रगतीची परंपरा कायम राखत संस्थेची विकास यात्रा अशाच वेगाने सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येतो.

**१४. सभासदांचे वार्षिक स्नेहसंमेलन :-** दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडतर्फे सभासदांमधील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी तसेच संस्थेच्या कार्याची माहिती सभासदांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रबोधनकार ठाकरे नाट्यमंदिर, बोरिवली (पश्चिम) येथे वार्षिक सभासद स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनास सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आणि मोठ्या संख्येने सभासदांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने सभासदांसाठी 'शिकायला गेलो एक' या लोकप्रिय नाटकाचा विशेष प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मा. आमदार सौ. मनीषाताई चौधरी, सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नती संघाचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री. नरेशभाई जनार्दन राऊत, संघाचे मुख्य विश्वस्त डॉ. श्री. दीपक चौधरी तसेच संस्थेचे सर्व माजी अध्यक्ष उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान संस्थेच्या विविध ठेव योजना, कर्ज योजना आणि सभासदांसाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक सुविधांविषयी सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. तसेच संस्थेच्या भावी विकासाची दिशा, विस्तार योजना आणि सभासद सेवा अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये उपस्थित सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध सूचना व मार्गदर्शन केले.

संपूर्ण स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि यशस्वी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमामुळे सभासदांमध्ये परस्पर स्नेहभाव अधिक दृढ झाला तसेच संस्था आणि सभासद यांच्यातील संबंध अधिक बळकट होण्यास मोलाची मदत झाली.

**१५. सेतु एका दृष्टिक्षेपात :** एकुण शाखा १० (रक्कम रुपये कोटी मध्ये)

| क्र. | तपशील | ३१मार्च २०२५ अखेर | ३१ मार्च २०२६ अखेर | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद | १३२६७ | १४०३९ | ५.८१ % |
| २. | भाग भांडवल | ५.६७ | ६.१९ | ९.१७% |
| ३. | वैधानिक राखीव निधी | ९.८६ | ११.२२ | १३.७९ % |
| ४. | ठेवी | १४७.८८ | १५४.३१ | ४.३५ % |
| ५. | कर्ज वाटप | १०२.२० | ११३.२१ | १०.७७ % |
| ६. | गुंतवणूक | ६७.६५ | ६७.५१ | -०.२१ % |
| ७. | इमारत निधी | ४.७ | ५.२८ | १२.३४ % |
| ८. | निव्वळ नफा | २.४६ | २.५२ | २.४४ % |
| ९. | एकूण उत्पन्न | १४.३३ | १४.६८ | २.४४ % |
| १०. | संस्था कर्मचारी वर्ग | २९ | ३२ | १०.३४% |
| ११. | ढोबळ अनुत्पादित कर्ज % | ३.५२ | २.६५ | -२४.७२ |
| १२. | स्वनिधी | २३.८९ | २६.९५ | १२.८१ % |
| १३. | सर्वसाधारण राखीव निधी | १.१८ | १.४७ | २४.५८ % |
| १४. | निव्वळ अनुत्पादित कर्ज % | ० | ० | ० |

**निव्वळ नफ्याची विभागणी :-** सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षात सेतुला रु. २,५२,३३,९८०.५४ इतका निव्वळ नफा झाला आहे. आर्थिक संस्थेसमोरची आव्हाने, खाजगी बँकांची प्रलोभने, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, नेट बँकिंग इत्यादी सुविधा साधने त्याचप्रमाणे व्यावसायिक स्पर्धा, सरकारी बंधने इत्यादी कारणांमुळे आपल्या सारख्या पतसंस्थांना निव्वळ नफ्यात वाढ करणे खूपच आव्हानात्मक होते. परंतु यावरही मात करून आपण सेतुच्या इतिहासातील सर्वोच्च नफ्याची नोंद केली आहे.

**गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी निव्वळ नफ्यामध्ये २.४४%ने वाढ झाली आहे.** दि. २१-०७-२०२६ रोजीच्या संचालक मंडळाच्या मासिक सभेमध्ये १०% दराने लाभांश मंजूर करून त्याचे वाटप ४२ व्या वार्षिक सभेच्या मंजुरीनंतर सभासदांच्या बचत खात्यात जमा करण्यात यावे असे ठरविण्यात आले. सदर वाटपास आपण या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी द्यावी अशी शिफारस संचालक मंडळाच्या वतीने करीत आहोत. त्याचप्रमाणे सर्वसाधारण सभेने खालीलप्रमाणे नफा विभागणीसही मान्यता द्यावी ही विनंती.

| | **रूपये** | **रूपये** |
|---|---:|---:|
| गतवर्षीय शिल्लक नफा | ८५.१६ | |
| चालू वर्षीय नफा | २,५२,३३,९८०.५४ | २,५२,३४,०६५.७० |
| **वजा** | | |
| वैधानिक राखीव निधी (२५%) | ६३,०८,५००.०० | |
| सर्वसाधारण राखीव निधी | २७,७०,०००.०० | |
| लाभांश १०% | ५८,५४,७२९.०० | |
| इमारत निधी | ९५,००,०००.०० | |
| सहकार शिक्षण निधी | १,००,०००.०० | |
| सभासद कल्याण निधी | १,००,०००.०० | |
| कर्मचारी कल्याण निधी | १,००,०००.०० | |
| कर्मचारी उपदान निधी (ग्रॅच्युईटी) | २,००,०००.०० | |
| तंत्रज्ञान विकास निधी | १,००,०००.०० | |
| निवडणूक निधी | २,००,०००.०० | २,५२,३३,२२९.०० |
| **शिल्लक सन २०२६-२०२७करीता** | | **८३६.७०** |

❖ ❖ ❖

# वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५ ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव
दि सेतू को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड
१ व २. वैशाली अपार्टमेंट, टी. पी. एस. III.
बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९२

दि सेतू को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, १ व २, वैशाली अपार्टमेंट, टी. पी. एस. III, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०० ०९२ या संस्थेच्या आर्थिक विवरणाचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे. त्यामधून ताळेबंद पत्रक ३१/०३/२०२६ पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरी पर्यंतचे नफा तोटा विवरण पत्र आणि हिशोबांच्या धोरणाचा अर्थपुर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेले असून, लेखापरीक्षण आम्ही १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक जबाबदारी**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांच्या अनुषंगाने ही वित्तीय विवरणे तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये, फसवणूक किंवा त्रुटीमुळे उद्‌भवणाऱ्या महत्त्वपूर्ण विसंगतींपासून मुक्त अशी वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल यांचा समावेश होतो.

**लेखापरीक्षकाची जबाबदारी**

२. केलेल्या लेखापरीक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरीक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकौंटट्स ऑफ इंडीया प्रमाणा प्रमाणे लेखापरीक्षणाचे संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितित्त्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे. लेखापरीक्षण योग्य आश्वासन पूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासुन मुक्त राहील व ते फसवणुक किंवा चुकी मुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

३. लेखापरीक्षणामधील हे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे. व ते लेखापरीक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्त्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणुक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि सादरीकरण नियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे लेखापरीक्षेमध्ये जमा खर्चाचे मुल्यांकनाच्या नियोजनाच्या वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

४. लेखापरीक्षेचा पुरावा जो आम्ही मिळवला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

**अभिप्राय**

५. आमच्या मतानुसार आणि आम्हांस मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्व साधारणपणे भारतात मान्य केला आहे.

(१) ताळेबंद पत्रकांच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२६

(२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत जमा आणि खर्च त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी.

**इतर कायदेशीर आणि नियमक बाबींवरील अहवाल**

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

७. अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणी स्पष्टीकरणानुसार जे आमच्या लेखापरीक्षणानुसार जरूर आहे ते मिळालेल्या पुर्ण माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आलेले आहे.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरण पत्रे योग्य आहेत.

८. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा तोटा विवरणपत्रक यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहेत.

९. **आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो,**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक, नफा तोटा विवरणपत्रक आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरणपत्रके याचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) लेखापरीक्षण चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला 'अ' वर्ग मिळाला आहे.

स्थळ :- मुंबई-४०० ०९२.
दिनांक :- १४/०७/२०२६

मे. अपराज अन्ड असोसिएटस्
सनदी लेखापाल- एम.नं. १८२६२६

# सेतुची दृष्टिक्षेपातील वाटचाल

(रुपये लाखांत)

| वर्ष | सभासद संख्या | भागभांडवल | राखीव निधी व इतर निधी | ठेवी | कर्जे | खेळते भांडवल | निव्वळ नफा | ढोबळ अनुत्पादित कर्जे | निव्वळ अनुत्पादित कर्जे | लेखा-परीक्षण वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८४-८५ | ५२२ | १.०० | ०.०१ | ०.२५ | १.२३ | २.२२ | ०.०२ | -- | -- | -- |
| १९८९-९० | २१८२ | ११.३२ | २.७३ | ३०.९१ | ४३.२७ | ४८.९२ | २.२३ | ०.२६ | -- | अ |
| १९९४-९५ | २८८४ | ३७.४४ | १९.६५ | १०७.७३ | ११५.९३ | १७८.९३ | ११.२० | ४.३३ | -- | अ |
| १९९९-२००० | ३१८४ | ७६.१६ | ६६.९२ | १९४.०८ | १६७.३५ | ३६२.६४ | २०.४४ | ९.३५ | -- | अ |
| २००४-२००५ | ४०३९ | १०२.१७ | १४४.०५ | ६३२.३३ | ५३६.१९ | ९०४.६९ | २४.९९ | ११.१९ | -- | अ |
| २००९-२०१० | ६३९८ | २२८.७५ | २४७.७९ | २८५१.४२ | २११६.९२ | ३५००.१५ | ६७.८५ | २.९६ | -- | अ |
| २०१४-२०१५ | ८३४२ | ३५३.७४ | ६६५.८८ | ७११२.७७ | ५२९३.२५ | ८३८२.८९ | १०४.६७ | ५८.७३ | -- | अ |
| २०१५-२०१६ | ८८७७ | ४१७.२४ | ८१३.२४ | ८२३१.०२ | ५६५३.७५ | ९७५१.६५ | १३९.५५ | ११७.८७ | -- | अ |
| २०१६-२०१७ | ९१७५ | ४२८.९७ | ९७०.०९ | ८९३८.५८ | ५३६३.३९ | १०६३५.१९ | १५०.२२ | ११९.५८ | -- | अ |
| २०१७-२०१८ | ९५५३ | ४४१.६४ | १,१००.६५ | ९४२८.२९ | ६४७२.०० | ११,२८७.८४ | १४७.९० | ९२.४८ | -- | अ |
| २०१८-२०१९ | ९८९२ | ४८१.७७ | १,२६४.०१ | १०३७७.१९ | ७५०४.२२ | १२,४४७.०२ | १५४.३६ | १२६.०५ | -- | अ |
| २०१९-२०२० | १०२२५ | ५१५.६५ | १४१४.२३ | ११३३७.२५ | ८००६.०९ | १३६७३.९७ | १३८.२७ | २२३.३५ | ६०.०० | अ |
| २०२०-२०२१ | १०३३३ | ५२०.८५ | १५८०.९९ | ११९७८.०३ | ८०३८.४६ | १४५९०.७४ | १५२.७९ | ३०५.१६ | ६९.७८ | अ |
| २०२१-२०२२ | १०३७७ | ५२३.७३ | १७१२.७६ | १२३३२.९९ | ७८७८.६७ | १५१८०.३४ | १५८.१८ | ७१२.४३ | ४२४.३५ | अ |
| २०२२-२०२३ | ११८५० | ५३६.७९ | १९५६.०७ | १२४२४.०७ | ८४५६.८३ | १५५२९.४५ | १७०.६६ | ५१६.०४ | २३३.७३ | अ |
| २०२३-२०२४ | १२५४९ | ५५२.७८ | २१३५.०४ | १३२८३.६९ | ९४५८.२७ | १६६८४.८९ | १७४.९६ | ४१४.२८ | १३१.८२ | अ |
| २०२४-२०२५ | १३२६७ | ५६६.८९ | २३७२.८५ | १४७८८.९७ | १०२२०.१५ | १८२२५.०१ | २४६.३८ | ३५९.४९ | ० | अ |
| २०२५-२०२६ | १४०३९ | ६१९.८१ | २६१२.१० | १५४३१.२८ | ११३२१.२५ | १९२०८.५८ | २५२.३४ | ३००.३३ | ० | अ |

## दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट
## ताळेबंद पत्रक

| ३१.०३.२०२५ रूपये | भांडवल व देणी | | ३१.०३.२०२६ रूपये |
|---:|---|---:|---:|
| | **१. भाग भांडवल** | | |
| | (अधिकृत भाग भांडवल प्रत्येकी | | |
| १०,००,००,०००.०० | १०० रू. चे १०००००० समभाग) | | १०,००,००,०००.०० |
| ५,६६,८९,४४०.०० | वसूल भाग भांडवल | | ६,१९,८१,९४०.०० |
| | **२. गंगाजळी व इतर निधी** | | |
| ९,८६,६०,५१३.४० | वैधानिक राखीव निधी | ११,२२,८४,२९०.४० | |
| ४,०१,६७,१७७.०० | बुडीत कर्ज निधी | ३,८३,०१,९४२.०० | |
| ४,७०,५०,०००.०० | इमारत निधी | ५,२८,००,०००.०० | |
| १५,४७,०००.०० | सहकार शिक्षण निधी | १६,४७,०००.०० | |
| २३,०६,०००.०० | इमारत दुरूस्ती निधी | २६,०६,०००.०० | |
| ३८,७६,०००.०० | सभासद कल्याण निधी | ४०,५१,०००.०० | |
| १८,१३,११८.०० | सामाजिक कृतज्ञता निधी | १८,८८,११८.०० | |
| ३२,००,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | ३५,००,०००.०० | |
| २६,०४,०२६.०० | कर्मचारी उपदान निधी (ग्रॅच्युईटी) | ३०,०४,०२६.०० | |
| १,०५,७९,०००.०० | गुंतवणूक चढ उतार निधी | १,०५,७९,०००.०० | |
| ३५,००,०००.०० | तंत्रज्ञान विकास निधी | ५०,००,०००.०० | |
| १,१८,५५,७४७.०० | सर्वसाधारण राखीव निधी | १,४७,५१,९७१.०० | |
| १४,५१,७४०.०० | निवडणूक निधी | २०,३५,७४०.०० | |
| ११,३९,४९३.०० | विकास निधी | १२,२५,०१८.०० | |
| ७५,३६,०००.०० | पी.एम.सी.बँक तरतुद | ७५,३६,०००.०० | २६,१२,१०,१०५.४० |
| २३,७२,८५,८१४.४० | | | |
| | **३. ठेवी** | | |
| २१,३०,४६८.०० | कर्मचारी ठेव | २३,०८,०८२.०० | |
| १,६१,२२,९८१.०० | मुदत ठेव | २,५८,८८,२६८.०० | |
| १,११,१०,७७,६०५.८० | संचय ठेव | १,२५,९१,३९,८७५.०७ | |
| १,७१,१५,८३५.०० | आवर्त ठेव | १,८३,५३,३६२.०० | |
| ४,३५,४९,९२६.०० | दैनंदिन ठेव | ४,५२,१२,५२१.०० | |
| १७,६६,५०,८४२.०४ | बचत ठेव | १९,१२,५८,९६९.०२ | |
| ३४,६०२.०० | नाममात्र सभासद बचत ठेव | ३६,१७५.०० | |
| १,७५,०८७.०० | विशेष ठेव योजना | १,०५,६७७.०० | |
| ११,२०,४०,४७५.०० | महिला विशेष ठेव योजना | ८,२६,०३३.०० | १,५४,३१,२८,९६२.०९ |
| १,४७,८८,९७,८२१.८४ | | | |
| | **४. इतर देणी व तरतुदी** | | |
| २०,१३,९५८.७७ | देय परतावा | २३,४६,७८६.७७ | |
| ६,९७,३३१.०० | उत्तरदायित्व (परिशिष्ट 'अ-I') | ६,५२,६१८.०० | |
| २५,६०,०००.०० | उत्पादित कर्ज तरतूद | २८,३५,०००.०० | |
| ८१,८०,३८६.०० | अनुत्पादित कर्ज तरतूद | ८३,७६,४४०.०० | |
| १,७८८.०० | देय निधी | १,९२३.०० | १,४२,१२,७६७.७७ |
| १,३४,५३,४६३.७७ | | | |

## सोसायटी लिमिटेड
## ३१ मार्च २०२६ अखेर

| ३१-०३-२०२५ रुपये | मालमत्ता व येणी | | ३१-०३-२०२६ रुपये |
|---|---|---|---|
| ३३,४९,०९१.०० | **१. रोख - हातातील रोख** | | १६,६७,०३३.०० |
| | **२. बँक शिल्लक** (परिशिष्ट 'अ-II') | | |
| ५०,०२३.३४ | म.रा.स.बँक | १९,७०८.८२ | |
| ८,६७,०२९.०४ | मु.जि.म.स. बँक | ११,२९,७८२.०४ | |
| ८,०१,९७९.४७ | ठा.जि.म.स.बँक | २३,१२,२७९.७७ | |
| ९,८१,३९६.६९ | वसई वि.स.बँक | २६,९१,३९८.५९ | |
| २३,९९,६९४.९६ | बँक ऑफ बडोदा | ३१,१३,१०४.८४ | |
| ९,७५,२११.९० | दि ठाणे जनता सह. बँक | २,३०,७५१.०४ | |
| १२,२५,०१०.२६ | दि सारस्वत को-ऑप बँक लि. | १४,२०,११४.५९ | |
| ७१,८१४.०५ | स्टेट बँक ऑफ इंडिया | २५,३८८.२४ | |
| ४,०५,३४८.७५ | बसीन कॅथोलिक को-ऑप बँक लि. | २,७४,८३४.४१ | |
| २०,५९,७०७.५४ | कॉसमॉस को-ऑप बँक, | ५,५८,६८८.९३ | |
| ४,६५,५१६.२० | युनिटी स्मॉल फायनान्स (PMC) | ६,८४,०६५.०० | |
| | वसई जनता सहकारी बँक, वसई | ६,५८,३९१.५० | १,३१,१८,५०७.७७ |
| १,०३,०२,७३२.२० | | | |
| ६२,३२०.०० | **३. अधेसिव्ह स्टॅम्प** | | ४७,९९५.०० |
| | **४. गुंतवणूक** (मुदत ठेव ) | | |
| ३,०३,००,०००.०० | टी.जे.एस.बी.स.बँक, बोरिवली | २,७२,७९,३८१.०० | |
| ९,००,००,०००.०० | शामराव विठ्ठल बँक | ७,३२,०६,४६७.०० | |
| ३,००,००,०००.०० | महा.स्टेट.को.ऑप.बँक | ३,२४,५०,७१७.०० | |
| ५,२२,८४,७९८.०० | मॅको बँक | १,७७,१५,३१३.०० | |
| ९,३५,१०,४०९.०० | म्युनिसिपल को.ऑप.बॅक.लि | ९,५५,३५,९३९.०० | |
| ३,१०,२०,०००.०० | एन.के जी एस बी बँक | २,३५,००,०००.०० | |
| ९,१२,०१,१५३.०० | कॉसमॉस बँक, बोरिवली | ९,४२,४८,०००.०० | |
| १२,७०,७९,०६५.०० | मु.जि.म.स.बँक | १३,४९,०६,९५७.०० | |
| ११,८१,९३,१११.०० | सारस्वत बँक | ५,११,४७,९५४.०० | |
| २५,००,०००.०० | वसई विकास सहकारी बँक | १,००,००,०००.०० | |
| ०.०० | ठा.जि.म.स.बँक | ९,५५,८०,०००.०० | |
| १,००,००,०००.०० | डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. | १,००,००,०००.०० | |
| ४,५०,०००.०० | कॉसमॉस बँक बोरिवली (Auto Sweep) | ९६,००,०००.०० | ६७,५१,७०,७२८.०० |
| ६७,६५,३८,५३६.०० | | | |
| | **५. गुंतवणूक** (भाग वर्गणी) | | |
| ४,४०,०००.०० | मु.जि.म.स.बँक | ४,४०,०००.०० | |
| ७५०.०० | वैशाली स.गृ.स., बोरिवली | ७५०.०० | |
| ५,५०,०००.०० | इफ्को | ५,५०,०००.०० | |
| १,०००.०० | पश्चिम उप. पतसंस्था फेडरेशन | १,०००.०० | |
| १००.०० | मु.जि.अ.को.ऑ.व्रे.सो.फेडरेशन | १००.०० | |
| ३,०००.०० | महाराष्ट्र राज्य स.पतसंस्था फेडरेशन | ३,०००.०० | |
| २,४२,७८,४४०.०० | युनिटी स्मॉल फायनान्स | २,४२,७८,४४०.०० | |
| ६०,६९,६१०.०० | युनिटी स्मॉल फायनान्स | ६०,६९,६१०.०० | ३,१३,४२,९००.०० |
| ३,१३,४२,९००.०० | | | |
| १,०२,२०,१५,९३५.०६ | **६. कर्ज व अग्रीम** (परिशिष्ट 'अ-III') | | १,१३,२१,२५,९८३.०६ |

## दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट
## ताळेबंद पत्रक

| ३१-०३-२०२५ रुपये | भांडवल व देणी | | ३१-०३-२०२६ रुपये |
|---|---|---|---|
| १,१०,९८,१६८.०० | **५. अनुत्पादित कर्जावरील येणे व्याज** | | १,१०,८४,४०२.०० |
| ०.०० | **६. राईट ऑफ अकाउंट कॉन्ट्रा एंट्री** | | ३९,९२,०८१.०० |
| ४,२६,०५८.०० | **७. मुदतपूर्ण ठेवी - व्याज तरतूद** | | ०.०० |
| ११,९९३.०० | **८. जादा रोकड** | | १३,९९२.०० |
| | **९. नफा तोटा खाते** | | |
| ५९०.५२ | गतवर्षीय शिल्लक | ८५.१६ | |
| २,४६,३७,६७७.६४ | चालू वर्षीय नफा | २,५२,३३,९८०.५४ | २,५२,३४,०६५.७० |
| १,८२,२५,०१,०२७.१७ | | | १,९२,०८,५८,३१५.९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| **मे. अपराज अँड असोसिएटस्**<br>वैधानिक लेखापरीक्षक | **सोनु आ. आरेकर**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | **विलास पां.सावे**<br>तज्ज्ञ संचालक | **भालचंद्र पां. जाधव**<br>संचालक |

## सोसायटी लिमिटेड
## ३१ मार्च २०२६ अखेर

| ३१-०३-२०२५ रुपये | मालमत्ता व येणी | | ३१-०३-२०२६ रुपये |
|---|---|---|---|
| २,४४,०८,१६८.०० | ७. **कार्यालयीन जागा** | ६६,३२,०४३.०० | |
| - १,७७,७६,१२५.०० | वजा घसारा | ६,६३,२०५.०० | ५९,६८,८३८.०० |
| ६६,३२,०४३.०० | | | |
| १७,९४,१११.०० | ८. **फर्निचर** | २२,९७,००९.०० | |
| - १,८०,०००.०० | वजा घसारा | २,२९,७०२.०० | २०,६७,३०७.०० |
| १६,१४,१११.०० | | | |
| ३४,७२१.३८ | ९. **कार्यालयीन साधनसामुग्री** | ३१,२२१.३८ | |
| - ३,५००.०० | वजा घसारा | ३,१२३.०० | २८,०९८.३८ |
| ३१,२२१.३८ | | | |
| १२,९५,७८६.५१ | १०. **संगणक व संलग्न उपकरणे** | १७,४७,५०७.५१ | |
| ५,२०,०००.०० | वजा घसारा | ५,८२,४५१.०० | ११,६५,०५६.५१ |
| ७,७५,७८६.५१ | | | |
| १०,०००.०० | ११. **डपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन** | | १०,०००.०० |
| | १२. **अनामत** | | |
| ३,९८०.०० | टेलिफोन निगम | ३,९८०.०० | |
| ०.०० | साई दिप अपार्टमेंट (वसई शाखा) | ५०,०००.०० | |
| ५,२३५.०० | रिलायन्स एनर्जी | ५,२३५.०० | |
| २९,७९,३५८.०० | म.रा.वि.वि.कंपनी लि. पालघर | ४१,७९१.०० | |
| ५०,०००.०० | प्रकाश अपार्टमेंट (चिंचणी शाखा) | ५०,०००.०० | |
| ०.०० | महालक्ष्मी अपार्टमेंट (डहाणू शाखा) | ५०,०००.०० | |
| १,००,०००.०० | चिंचणी समाज ट्रस्ट | ०.०० | २,०१,००६.०० |
| ३१,३८,५७३.०० | | | |
| | १३. **इतर येणी** | | |
| ३,९२,४६,३९२.०० | गुंतवणूकीवरील व्याज | १,९६,३४,७५७.०० | |
| १३,६७,१०१.९५ | आयकर परतावा | १३,६९,७५७.९५ | |
